2 7 DEC 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. मनमोहन सिंग आणि विद्यापीठाचा पदवीदान समारंभ

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २६ : भारताचे माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांचे आज रात्री निधन झाले. त्यानंतर शिवाजी विद्यापीठातील पदवीदान समारंभातील त्यांच्या त्यावेळच्या उपस्थितीसंदर्भातील साऱ्या स्मृतींना गुरुवारी उजाळा मिळाला.

२५ नोव्हेंबर १९९४ रोजी शिवाजी विद्यापीठात झालेल्या ३१ व्या पदवीदान समारंभाला डॉ. मनमोहन सिंग प्रमुख पाहुणे होते. ते तेव्हा केंद्रीय अर्थमंत्री होते. 'भारत आतापर्यंत कधी नव्हता इतक्या संधीच्या उंबरठ्यावर आहे. या संधी ओळखण्याचे आणि त्यांचा वापर करण्याचे शहाणपण आपल्याजवळ असणे गरजेचे आहे,' असे स्पष्ट मत त्यांनी यावेळी व्यक्त केले होते. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे तत्कालीन कुलपती व राज्यपाल डॉ. पी. सी. अलेक्झांडर होते. खास मंडपात पदवीदानाचा शानदार समारंभ झाला होता. योगायोगाने कालच या घटनेला ३० वर्षे पूर्ण झाली आहेत.



कोल्हापूर : २५ नोव्हेंबर १९९४ रोजी शिवाजी विद्यापीठात झालेल्या ३१ व्या पदवीदान समारंभाला तत्कालीन केंद्रीय अर्थमंत्री डॉ. मनमोहन सिंग प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. शेजारी तत्कालीन राज्यपाल डॉ. पी. सी. अलेक्झांडर, तत्कालीन कुलगुरू डॉ. आप्पासाहेब वरुटे, तत्कालीन कुलसचिव व्ही. के. घाटे.


### अर्थमंत्री असताना तीन वेळा भेट : खासदार शाहू महाराज

'माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्या निधनामुळे देश एका जागतिक दर्जाच्या महान अर्थतज्ज्ञाला मुकला आहे. भारताची अर्थ व्यवस्था सुधारण्यात त्यांचे महत्वपूर्ण योगदान राहिले आहे. अर्थमंत्री असताना त्यांच्याशी आमची तीन वेळा भेट झाली होती. तेव्हा त्यांच्याशी अर्थव्यवस्थेवर चर्चा करण्याची संधी मिळाली. १९९१ साली पी. व्ही. नरसिंहराव मंत्रिमंडळात मनमोहन सिंग केंद्रीय अर्थमंत्री होते. त्या काळात त्यांनी केलेल्या आर्थिक सुधारणा आणि त्यानंतर झालेल्या आर्थिक प्रगतीमुळे त्यांची कार्यक्षम राजकारणी म्हणून प्रतिमा बनली. पंतप्रधान झाल्यानंतर शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यावर त्यांनी भर दिला होता. आज देशात जी समृद्धी दिसते, त्याचा पाया डॉ. मनमोहन सिंग यांच्या आर्थिक धोरणातून घातला गेला, अशी प्रतिक्रिया खासदार शाहू महाराज यांनी दिली.

### शांत-संयमी नेतृत्व हरपले : खासदार धनंजय महाडिक

'माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांचे निधन देशाची हानी करणारे आहे. एक निष्णात अर्थतज्ज्ञ म्हणून त्यांनी दिलेले योगदान कधीच विसरता येणार नाही. एक शांत, संयमी आणि निष्कलंक नेतृत्व म्हणूनही मनमोहन सिंग यांची राजकीय कारकीर्द कायम स्मरणात राहील. पक्षनिष्ठा आणि मिळालेल्या पदाला पूर्ण न्याय देण्याचा त्यांचा हातखंडा राजकारणातील प्रत्येक कार्यकर्त्यासाठी आदर्शवत आहे. काँग्रेस पक्षाच्या जडणघडणीत आणि देशाच्या प्रगतशील वाटचालीमध्ये मनमोहन सिंग यांचे योगदान मोठे आहे', अशी प्रतिक्रिया खासदार धनंजय महाडिक यांनी व्यक्त केली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 DEC 2024
पुढारी




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या संख्याशास्त्र अधिविभागातील पहिले आंतरराष्ट्रीय पीएच.डी.धारक विद्यार्थी महम्मद खादीम शन्शुल यांनी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची सदिच्छा भेट घेतली. यावेळी डॉ. शशिभूषण महाडिक व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील.

# संख्याशास्त्र अधिविभागातून पहिल्या आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्याला पीएच.डी.

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या संख्याशास्त्र अधिविभागातून पहिल्या आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्याने पीएच.डी. पदवी प्राप्त केली. महम्मद खादीम शन्शुल असे विद्यार्थ्याचे नाव असून, तो इराकचा नागरिक आहे. शन्शुल यांनी संख्याशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. शशिभूषण महाडिक यांच्या मार्गदर्शनाखाली 'अ‍ॅडव्हान्स्ड नॉन पॅरामेट्रिक कंट्रोल चार्ट्स' विषयावर शिवाजी विद्यापीठास प्रबंध सादर केला. संख्याशास्त्र विषयाचे प्राध्यापक असणारे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी महम्मद शन्शुल यांचे अभिनंदन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 DEC 2024
पुण्यनगरी




कोल्हापूर : महम्मद खादीम शन्शूल यांनी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांची सदिच्छा भेट घेतली.

# 'संख्याशास्त्र'तून आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यास पीएच.डी.

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या संख्याशास्त्र अधिविभागातून पहिल्या आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्याने पीएच.डी. पदवी प्राप्त केली. महम्मद खादीम शन्शूल हा विद्यार्थी इराकचा नागरिक आहे. शन्शूल यांनी संख्याशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. शशिभूषण महाडिक यांच्या मार्गदर्शनाखाली 'ॲडव्हान्स्ड नॉन पॅरामेट्रिक कंट्रोल चार्टस्' या विषयावर शिवाजी विद्यापीठास प्रबंध सादर केला. संख्याशास्त्र विषयाचे प्राध्यापक असणारे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी त्यांचे अभिनंदन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 DEC 2024
तरुण भारत



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील संख्याशास्त्र अधिविभागातील पहिले आंतरराष्ट्रीय पीएच. डी. प्राप्त विद्यार्थी महम्मद खादीम शन्शुल यांनी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची सदिच्छा भेट घेतली. सोबत डॉ. शशीभूषण महाडिक, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील.

# पहिल्या आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्याला पीएच. डी.

**प्रतिनिधी**

कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या संख्याशास्त्र अधिविभागातून पहिल्या आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्याने पीएच. डी. पदवी प्राप्त केली. महम्मद खादीम शन्शुल असे या विद्यार्थ्याचे नाव असून तो इराकचा नागरिक आहे. शन्शुल यांनी 'ॲडव्हान्स्ड नॉन पॅरामेट्रिक कंट्रोल चार्ट्स' या विषयावर शोध प्रबंध सादर केला आहे. या विषयासाठी त्यांना संख्याशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. शशीभूषण महाडिक यांचे मार्गदर्शन लाभले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी महम्मद शन्शुल यांचे अभिनंदन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 DEC 2024
सकाळ

# संख्याशास्त्र अधिविभागातून पहिला आंतरराष्ट्रीय विद्यार्थी पीएच.डी.


महम्मद शन्शुल

कोल्हापूर, ता. २६ : शिवाजी विद्यापीठाच्या संख्याशास्त्र अधिविभागातून आज पहिल्या आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्याने पीएच.डी. पदवी प्राप्त केली. महम्मद खादीम शन्शुल असे या विद्यार्थ्याचे नाव असून, तो इराकचा नागरिक आहे. शन्शुल यांनी डॉ. शशिभूषण महाडिक यांच्या मार्गदर्शनाखाली 'ॲडव्हान्स्ड नॉन पॅरामेट्रिक कंट्रोल चार्ट्स' या विषयावर प्रबंध सादर केला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 DEC 2024
पुढारी

# विद्यापीठात वीर बाल दिवसानिमित्त अभिवादन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठात वीर बाल दिवसानिमित्त हुतात्मा बालकांना अभिवादन करण्यात आले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते बाबा जोरावरसिंह व बाबा फतेह सिंह यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. कैलास सोनवणे, डॉ. ज्योती जाधव, डॉ. पद्मा दांडगे, डॉ. कल्याणराव गरडकर, डॉ. पंकज पवार, डॉ. एस. एस. काळे यांसह संशोधक विद्यार्थी, अधिकारी व सेवक उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 DEC 2024
सकाळ

# हुतात्मा बालकांना विद्यापीठात अभिवादन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात गुरुवारी वीर बाल दिवसानिमित्त हुतात्मा बालकांना अभिवादन करण्यात आले. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये सकाळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते बाबा जोरावरसिंह आणि बाबा फतेह सिंह यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. गुरू गोविंद सिंह यांच्या बाबा जोरावर सिंह (९ वर्षे) आणि बाबा फतेह सिंह (७ वर्षे) या दोन लहान मुलांनी दिलेल्या बलिदानाचे प्रतीक म्हणून २६ डिसेंबर 'वीर बाल दिवस' म्हणून साजरा केला जातो. सन १७०५ मध्ये मुघलांनी या बालकांना त्यांच्या दोन मोठ्या भावांसह मारले होते. गुरू गोविंद सिंह आणि त्यांच्या कुटुंबीयांचे शौर्य आणि आदर्श यांचे या दिवशी स्मरण केले जाते. अभिवादनप्रसंगी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. कैलास सोनवणे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 DEC 2024
तरुण भारत

# वीर बाल दिनानिमित्त विद्यापीठात अभिवादन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात वीर बाल दिनानिमित्त कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र- कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते बाबा जोरावरसिंह आणि बाबा फतेहसिंह यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. गुरु गोविंदसिंह यांच्या बाबा जोरावरसिंह (९ वर्षे) आणि बाबा फतेहसिंह (७ वर्षे) या दोन लहान मुलांनी दिलेल्या बलिदानाचे प्रतीक म्हणून २६ डिसेंबर वीर बाल दिन म्हणून साजरा केला जातो. सन १७०५ मध्ये मुघलांनी या बालकांना त्यांच्या दोन मोठ्या भावांसह मारले होते. गुरू गोविंदसिंह आणि त्यांच्या कुटुंबीयांचे शौर्य आणि आदर्श यांचे या दिवशी स्मरण केले जाते. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, रसायनशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. कैलास सोनवणे, जैवरसायनशास्त्र अधिविभागाच्या डॉ. ज्योती जाधव, डॉ. पद्मा दांडगे, डॉ. कल्याणराव गरडकर, डॉ. पंकज पवार, डॉ. एस. एस. काळे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 DEC 2024
लोकमत

# विद्यापीठाचा मुलांचा संघ भटिंडाला रवाना

कोल्हापूर : भटिंडा येथे होणाऱ्या अखिल भारतीय विद्यापीठ बॉक्सिंग स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठातील मुलांचा संघ रवाना झाला. या स्पर्धा २५ डिसेंबर ते ०२ जानेवारी दरम्यान भटिंडा पंजाब येथे आहेत. संघात संदेश काटकर, तन्मय कळंत्रे, राज पाटील, ऋषिकेश घाडगे, प्रेमदास शिरोटे, आदित्य जाधव, ओम इटकर, ओम हेरूर, सौरभ सावंत, प्रणव रोडे, रामानुज सिंग, सोमराज चौगुले यांचा समावेश आहे. प्रशिक्षक व संघ व्यवस्थापक म्हणून प्रा. अभिजित आंबी यांची निवड केली. खेळाडूंना कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, प्रकुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, डॉ. व्ही. एन. शिंदे व डॉ. शरद बनसोडे यांचे प्रोत्साहन मिळाले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 DEC 2024

लोकमत

# विद्यापीठात हुतात्मा बालकांना अभिवादन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात गुरुवारी वीरबाल दिवसानिमित्त हुतात्मा बालकांना अभिवादन करण्यात आले. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र- कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते बाबा जोरावरसिंह आणि बाबा फतेह सिंह यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

गुरु गोविंद सिंह यांच्या बाबा जोरावर सिंह (९ वर्षे) आणि बाबा फतेह सिंह (७ वर्षे) या दोन लहान मुलांनी दिलेल्या बलिदानाचे प्रतीक म्हणून २६ डिसेंबर 'वीर बाल दिवस' म्हणून साजरा केला जातो. सन १७०५ मध्ये मुघलांनी या बालकांना त्यांच्या दोन मोठ्या भावांसह मारले होते. गुरू गोविंद सिंह आणि त्यांच्या कुटुंबीयांचे शौर्य आणि आदर्श यांचे या दिवशी स्मरण केले जाते. याप्रसंगी डॉ. विलास शिंदे, डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. कैलास सोनवणे, डॉ. ज्योती जाधव, डॉ. पद्मा दांडगे, डॉ. कल्याणराव गरडकर, डॉ. पंकज पवार, डॉ. एस. एस. काळे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 DEC 2024
सकाळ



## आपण दोघे दोस्त...

थंडीच्या दिवसांत उन्हाची कोवळी तिरीप माणसाला जशी हवीहवीशी वाटते, तशीच ती प्राणीपक्ष्यांना देखील हवीशी वाटते. शिवाजी विद्यापीठाच्या संगीत अधिविभागाशेजारील तलावामधील झाडावर असेच दृश्य पाहावयास मिळाले. तलावातील कासव आणि साप असे शेजारी शेजारी बसले होते. अर्ध्या तासापेक्षा जास्त काळ निसर्गाचे हे सहजीवन सकाळी फिरणाऱ्या पादचाऱ्यांना पाहण्यास मिळाले. विद्यापीठातील मास कम्युनिकेशन विभागामधील विद्यार्थी सचिन बनसोडे यांनी याबाबतचे छायाचित्र टिपले आहे.

27 DEC 2024
लोकसत्ता
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



# आपण दोघे दोस्त; ऊन खाऊ मस्त!

थंडीच्या दिवसांत उन्हाची कोवळी तिरीप माणसाला जशी हवीहवीशी वाटते, तशीच ती प्राणी-पक्ष्यांनादेखील हवीशी वाटते. शिवाजी विद्यापीठाच्या संगीत अधिविभागाशेजारील तलावामधील झाडावर असेच दृश्य गुरुवारी पाहण्यास मिळाले. तलावातील कासव आणि साप कोवळे ऊन खाण्यासाठी असे शेजारी शेजारी येऊन बसले होते. अर्ध्या तासापेक्षा जास्त काळ निसर्गाचे हे सहजीवन सकाळी फिरणाऱ्या पादचाऱ्यांना पाहण्यास मिळाले.

(छाया - सचिन बनसोडे)

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 DEC 2024
पुढारी

# शिवाजी विद्यापीठ नेटबॉल स्पर्धेस प्रारंभ

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ व आजरा महाविद्यालयांच्या संयुक्त विद्यमाने पुरुष व महिला संघाच्या नेटबॉल स्पर्धेचे उद्‌घाटन सिद्धार्थ शिंदे (सदस्य, शिवाजी विद्यापीठ अधिसभा), अ‍ॅड. स्वागत परुळेकर, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, योगेश पाटील (कार्यालयीन अधीक्षक महाविद्यालय, आजरा), डॉ. धनंजय पाटील (शारीरिक शिक्षण संचालक, आजरा महाविद्यालय), एम. एस. पाटील (पर्यवेक्षक), अल्बर्ट फर्नांडिस (क्रीडा शिक्षक) यांच्या हस्ते झाले. स्पर्धेत सांगली, सातारा, कोल्हापूर या तिन्ही जिल्ह्यांतील विविध महाविद्यालयांचे २५० हून अधिक खेळाडू सहभागी झाले आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 DEC 2024
तरुण भारत

# विद्यापीठ महिला क्रिकेट स्पर्धेत शहाजी कॉलेजची हॅट्ट्रिक

**कोल्हापूर :** डी. वाय. पाटील मेडिकल कॉलेज येथे झालेल्या शिवाजी विद्यापीठ अंतरविभागीय क्रिकेट स्पर्धेमध्ये शहाजी महाविद्यालयाच्या महिला क्रिकेट संघाने सांगली, सातारा व कोल्हापूर संघाबरोबर विजय मिळवत सलग तिसऱ्यांदा विजेतेपद पटकावले. सलग तिसऱ्यांदा प्रथम क्रमांक विजेता शहाजी महाविद्यालय मुलींचा संघ ठरला. या स्पर्धेमध्ये कर्णधार सौम्यलता बिराजदार, उपकर्णधार सानिका लाड, स्नेहा साळे, सिद्धी चव्हाण व साक्षी पाटील यांनी चमकदार कामगिरी केली. त्यांची निवड उदयपूर येथे होणाऱ्या अंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी झाली. सर्व विजेत्या खेळाडूंना श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्थेचे चेअरमन मानसिंग बोंद्रे, रुपेश खांडेकर, प्राचार्य डॉ. आर के. शानेदिवाण, रवींद्र भोसले, मनीष भोसले,डॉ. प्रशांत पाटील, प्रा. प्रशांत मोटे, सरदार पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.